# नगर परिषद कार्यालय, वाशिम

E-mail-mcwashim@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२००९

फॅक्स क्रमांक ०७२५२-२३१०४१

जा.क्र. :नपवा/कार्या-१४/रेखांकन मंजूरी/2066 /२०१७

नगर परिषद कार्यालय,वाशिम जि.वाशिम .

दिनांक 26/08/2017

APPENDIX 'D -3'

FINAL APPROVAL FOR DEMARCATED LAND / SUB DIVISION LAYOUT.

प्रति,

**तुलसी इंफ्रा. प्रोजेक्ट प्रा.लि.**
**तर्फे श्री विवेक स. पाटणी**
रा. जवाहर कॉलनी ,वाशिम
जिल्हा ,वाशिम

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये सादर केलेल्या अभिन्यास मौजे वाशिम ता. वाशिम स.नं.३२४/३ ते ३२४/१३ व ३२५/२/१,३२५/२/२, व ३२५/२-अ मधील एकूण ४२३३०.०० चौ.मी. जागा वाणिज्य प्रयोजना करिता अकृषक मध्ये रुपांतरीत सुधारीत सिमांकीत अभिन्यासाला अंतिम मंजूरी बाबत .

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. नपवा/कार्या-१४/ रेखाकंन मंजूरी /२८०१/२०११, दि. २७.१२.२०११.
२) मा. सहायक संचालक, नगर रचना वाशीम यांचे पत्र क्र. अकृषक /वाशिम/३२४,३२५/ससंवा/ १०१३ दि. २६.१२.२०११ .
३) आपले दिनांक २०.०४.२०१७ रोजीचे विनंती अर्ज .

उपरोक्त विषयी मौजे वाशिम येथील २ स.नं.३२४/३ ते ३२४/१३ व ३२५/२/१,३२५/२/२, व ३२५/२-अ मधील एकूण ४२३३०.०० चौ.मी. जागा जमीनीचे सिमांकीत अभिन्यासाला मा. सहायक संचालक नगर रचना वाशिम यांनी संदर्भिय पत्र क्रं.०१ अन्वये अंतिम मंजूरी प्रदान केली आहे.तसेच या कार्यालयाने संदर्भिय पत्र क्रं. ०१ अन्वये अकृषक करण्यासाठी या कार्यालयाने नाहरकत दिले आहे. संदर्भिय विनंती अर्ज क्र. ०३ दि.२०.०४.२०१७ रोजी सुधारीत अभिन्यास नकाशा मंजूरीस्तव प्राप्त झाले आहे. सादर केलेल्या सिमांकीत सुधारीत अभिन्यासाला वाण्णिज्य वापरा करिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ४५ तसेच महाराष्ट्र नगर परिषदां, नगर पंचायती व औद्योगिक वसाहती १९६५ चे कलम १८९ मधील तरतूदीनूसार खालील अटी व शर्तीला अधिन राहून अंतिम मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

१) अभिन्यास नकाशातील सर्व विकासाची कामे जसे रस्ते, भूयारी गटार, पिण्याचे पाणीची व्यवस्था, पुल, कलवर्ट, पथदिवे इत्यादी बांधकाम मुख्याधिकारी यांचे समाधान होई पर्यंत स्वखर्चाने करुन नगर परिषदेस भुखंड धारकांची संस्था /संघटना नोंदणीकृत होई पर्यंत नगर परिषदेस विनामूल्य हस्तांतरीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील .

२) अनूक्रमांक १ मधील प्राथमिक विकासाचे बांधकाम नगर परिषद मार्फत करावयाचे झाल्यास नगर परिषदेने तयार केलेल्या अंदाजपत्रका नूसार रक्कम नगर परिषदेस जमा करावी लागेल .

३) सदरची विकास परवानगी फक्त आपल्या मालकीच्या जमीनी विकसीत करण्यासाठी मर्यादीत असून आपल्या मालकीच्या नसलेल्या जमीनीवर विकसीत करण्यासाठी नाही .

४) आदर्श विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील अनुच्छेद क्र.१३.३ मध्ये नमुद तरतूदी नूसार अभिन्यासातील खुली जागा सदर अभिन्यासातील भूखंड धारकांनी तयार केलेल्या संस्थेच्या मालकीने करावी . सदर खुली जागे बाबत आपले कोणतेही अधिकार राहणार नाही तसेच भूखंड धारकांनी तयार केलेल्या संस्था नोंदणीकृत होई पर्यंत सदर खुली जागा देख रेख व व्यवस्थे करीता मुख्याधिकारी नगर परिषद वाशिम यांचे कडे राहील.

५) सदर अभिन्यासातील भूखंड नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय विभाजन करता येणार नाही .

६) सदर अभिन्यासातील भूखंडावर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम करता येणार नाही .

--२

७) लगतच्या जागेचे हद्दीबाबत कोणतेही प्रश्न भविष्यात उदभवल्यास त्याबाबतची कोणतीही जबाबदारी नगर परिषदेची राहणार नाही .

८) उपअधिक्षक भुमी अभिलेख्र वाशिम यांच्या कडून सिमाकंन करुन अतिम सिमाकंनाचा नकाशा या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील .

मुख्याधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
नगर परिषद वाशिम

प्रतिलिपी :-

१) मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा. तहसिलदार, वाशिम यांना माहितीकरिता सविनय सादर .
३) मा. उपअधिक्षक, भुमी अभिलेख्र, वाशिम यांना माहिती करिता सादर

comp data\M-Israil N.A.doc/ 208